# बृहन्मुंबई महानगरपालिका

एमडीवी / २१८७ / ओडी दि. २०/०८/२०१८

मा. आयुक्तांच्या दिनांक १०.११.२०१७ रोजीच्या क्र.एमजीसी/एफ/३१८१ च्या निर्देशानुसार परिमंडळीय नगर पथविक्रेता समिती (परिमंडळ-१) गठीत करण्यात आली असून, सदर समितीची पहिली बैठक गुरुवार, दिनांक १६.०८.२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता 'ई' विभाग कार्यालयातील सभागृहात आयोजित करण्यात आली असून, सदर बैठकीत खालील शासकीय प्रतिनिधी, फेरीवाला संघटनांचे प्रतिनिधी, बिगर शासकीय सदस्य उपस्थित होते.

(अ) शासकीय प्रतिनिधी

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. हर्षद अनिल काळे | : | उपायुक्त (परिमंडळ-१) - पदसिध्द अध्यक्ष |
| २. | डॉ. रमेश गावित | : | सहाय्यक आरोग्य अधिकारी (ए, बी, सी विभाग) |
| ३. | डॉ. श्रीम. प्रणिता टिपरे | : | सहाय्यक आरोग्य अधिकारी (डी, ई विभाग) |

(ब) फेरीवाला संघटनांचे प्रतिनिधी

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. समिर पाठारे | : | हिंदुस्तान स्वयंरोजगार हॉकर्स युनियन |
| २. | श्री. बापूराव धायगुडे | : | घाटकोपर हॉकर्स युनियन |
| ३. | श्री. संजय गुरव | : | वडापाव विक्रेता सेना |
| ४. | श्री. सय्यद सलीम इब्राहीम | : | महाराष्ट्र एकता हॉकर्स युनियन |
| ५. | श्री. रामबाबू गुप्ता | : | लोहिया विचारमंच हॉकर्स युनियन |

(क) बिगर शासकीय सदस्य

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्रीम. जेनिफर शेट्टी | : | AGNI (ॲक्शन फॉर गव्हर्नन्स ॲण्ड नेटवर्किंग इन इंडिया) |
| २. | श्रीम. नयना कठपालीया | : | NAGAR (एन.जी.ओ. अलाईन्स फॉर गव्हर्नन्स ॲण्ड रिन्युवल) |
| ३. | श्री. आर.आर.गुप्ता | : | नरिमन पॉईट असोसिएशन |
| ४. | श्री. मुकुल मेहरा | : | एन.एस.आर.सी.एफ. (नेपियन सी रोड, सिटीझन फोरम) |
| ५. | श्री. विरेन शहा | : | फेडरेशन ऑफ रिटेल ट्रेडर्स |
| ६ | श्री. दिपक राजाराम थोरले | : | संत गाडगे महाराज फ्रुट आणि व्हेजीटेबल मर्चंट वेल्फेअर एकता असोसिएशन |
| ७. | श्री. संजीव व्ही. साप्ते | : | बँक ऑफ इंडिया |

मनपाचे इतर अधिकारी वर्ग (सदस्य नाही)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. किरण दिघावकर | : | सहाय्यक आयुक्त, ए विभाग |
| २. | श्री. विवेक राही | : | सहाय्यक आयुक्त, बी विभाग |
| ३. | श्री. विश्वास मोटे | : | सहाय्यक आयुक्त, डी विभाग |
| ४. | श्रीम. नीला पतंगे | : | उप अनुज्ञापन अधीक्षक (शहर) |
| ५. | श्री. सुनिल दळवी | : | वरिष्ठ निरीक्षक (अनुज्ञापन) ए विभाग |
| ६ | श्री. जगदिश पाटील | : | वरिष्ठ निरीक्षक (अतिक्रमण निर्मुलन) ए विभाग |

| | | |
|---|---|---|
| ७. | श्री. विलास पवार | : वरिष्ठ निरीक्षक (अनुज्ञापन) बी विभाग |
| ८. | श्री. जगदिश कैंगळे | : वरिष्ठ निरीक्षक (अतिक्रमण निर्मुलन) बी विभाग |
| ९. | श्री. निलय पवार | : वरिष्ठ निरीक्षक (अतिक्रमण निर्मुलन) सी विभाग |
| १०. | श्री. विजय गावडे | : वरिष्ठ निरीक्षक (अनुज्ञापन) डी विभाग |
| ११. | श्री. रमेशकुमार सिंह | : वरिष्ठ निरीक्षक (अतिक्रमण निर्मुलन) डी विभाग |
| १२. | श्री. सुनिल भोसले | : वरिष्ठ निरीक्षक (अनुज्ञापन) ई विभाग |
| १३. | श्री. विनायक निवाते | : वरिष्ठ निरीक्षक (अतिक्रमण निर्मुलन) ई विभाग सदस्य सचिव |

तसेच पूर्वसूचना देऊनही सदर बैठकीस पोलिस आयुक्त, पोलिस सह आयुक्त (वाहतुक) व विशेष नियोजन प्राधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित नव्हते.

बैठकीच्या सुरुवातीस वरिष्ठ निरीक्षक (अतिक्रमण निर्मुलन) ई विभाग यांनी परिमंडळीय नगर पथविक्रेता समितीच्या कामकाजाचे स्वरुप स्पष्ट केले. त्यांनी असे स्पष्ट केले की, महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) अधिनियम, २०१४ व महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम, २०१६ नुसार मुख्यालय पातळीवर नगर पथ विक्रेता समितीची निवड करण्यात आलेली आहे. त्यामध्ये महानगरपालिका आयुक्त अध्यक्ष आहेत, पोलिस आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे कार्यकारी प्रमुख, पोलिस सहआयुक्त (वाहतुक) व कार्यकारी आरोग्य अधिकारी हे सदस्य आहेत. तसेच, फेरीवाले संघटनांचे ०८ प्रतिनिधी, शासकीय ०५ प्रतिनिधी, बिगर शासकीय संस्थेचे ०६ प्रतिनिधी व लीड बँकेचे प्रतिनिधी अशा एकूण २० सदस्यांचा त्यात समावेश करण्यात आलेला आहे. याच धर्तीवर परिमंडळ-१ करीता नगर पथ विक्रेता समितीमधील सदस्यांची निवड करण्यात आली आहे.

नगर पथ विक्रेता समितीची बैठकी ही साधारणपणे तीन महिन्यांच्या कालावधीत किमान एकदा घेण्यात येईल. बैठक ठरविण्यात आल्याच्या दिवसापासून सात दिवसाअगोदर नगर पथ विक्रेता समितीच्या सर्व सदस्यांना बैठकीच्या कार्यसूचीसह बैठक घेण्याबाबतची नोटीस पाठविण्यात येईल. बैठकीची गणपूर्ती ही नगर पथ विक्रेता समितीच्या एकूण संख्याबळाच्या दोन तृतीयांश सदस्य इतकी असणार आहे. गणपूर्ती अभावी कोणतीही बैठक घेण्यात येणार नाही आणि गणपूर्ती होत नसेल तर, बैठक तहकुब करण्यात येईल. नगर पथ विक्रेता समिती ही परिमंडळ-१ मधील ए, बी, सी, डी आणि ई या पाचही विभागांकरीता आहे. तद्नंतर बैठकीस उपस्थित असलेल्या सर्व सदस्यांनी सभागृहास आपला परिचय करुन दिला.

सदर बैठकीमध्ये एक सादरीकरण दाखविण्यात आले. त्यामध्ये :

1. ना-फेरीवाला क्षेत्र निर्देशित करण्याचे निकष.
2. मा. उप आयुक्त (फे.नि.) यांच्या परिपत्रक क्र.उप आयुक्त / फे.नि./११५४ दि.०८.०९.२०१५ अन्वये सदर बैठया जागा निश्चित करण्यासाठी दिलेले निर्देश.
3. पथविक्रेता म्हणून नोंदणी करण्यासाठी पात्रता / निकष.
4. नगर पथ विक्रेता समितीचे कामकाज चालविण्याची कार्यपध्दती (कलम २२)
5. नगर पथ विक्रेता समितीची कार्ये (कलम २३)
6. फेरीवाला अर्जाबाबतचा तपशिल.
7. प्रस्तावित फेरीवाला रस्ते व पीचेस आणि अनुज्ञापित फेरीवाल्याची संख्या याबाबत माहिती देण्यात आली.

सदर सादरीकरणानंतर सदस्यांनी काही प्रश्न उपस्थित केले, जसे की :

1) रुग्णालयांबाबत कोणत्या धर्तीवर रुग्णालयांचा समावेश करायचा म्हणजेच १०० बेड किंवा अधिक, शासकीय आणि मनपा रुग्णालये इ.

ब) तसेच शाळेंबाबत कोणते निकष आहेत ? म्हणजे मनपा शाळा किंवा ठराविक विदयार्थ्यांची संख्या इ.

1) १५ वर्षांचे वास्तव्य प्रमाणपत्र (domicile) किंवा १० वर्षांचे वास्तव्य प्रमाणपत्र स्विकारणार का ?

ड) सन १९९८ व २००२ चे टाटा सर्वेक्षण चालणार का ?

इ) सन २०१४ च्या सर्वेक्षणामध्ये ज्यांनी अर्ज सादर केला आहे ती व्यक्ति सन २०१८ साली मयत असेल तर त्या घरातील वारस पात्र होईल का ?

अध्यक्षांनी वरील सादरीकरण व इतर प्रश्न उत्तरांची नोंद करुन खालीलप्रमाणे पुढील प्रक्रिया निश्चित केली.

1. पाचही विभागांचे वरिष्ठ निरीक्षक ( अतिक्रमण निर्मुलन) यांचे भ्रमणध्वनी क्रमांक समिती सदस्यांना कळविणे.
2. सदर सदस्यांना कोणत्याही विभागामध्ये फेरीवाला क्षेत्र निवड झालेल्या रस्त्याचे व त्यावर सुचविलेल्या पिचेसचे निरीक्षण करावयाचे असल्यास समिती सदस्यांनी वरील १ मध्ये नमुद केलेल्या अधिका-यांना संयुक्त पहाणी करण्याबाबत संपर्क साधावा.
3. परिमंडळ-१ चे कामकाज सुलभ करण्यासाठी zone1tvc@gmail.com हा ई-मेल आयडी बनविण्यात आलेला आहे.
4. सदस्यांच्या काही सूचना / आक्षेप असल्यास त्यांनी zone1tvc@gmail.com या ई-मेल वर पाठवाव्यात.
5. सदस्यांना स्वत:च्या सूचना मांडावयाच्या असतील तर दि.२६.०८.२०१८ पर्यंत उपरोक्त नमुद ई-मेल आयडी वर आपल्या सूचना कळविण्यात याव्यात.

तदंनतर वरिष्ठ निरीक्षक ( अतिक्रमण निर्मुलन) ई विभाग यांनी प्राप्त झालेले सर्व ई-मेलचे वर्गीकरण/ सारांश करुन अनुज्ञापन अधीक्षक (संबंधित विभागातील अधिकारी) / विधी अधिकारी /उपायुक्त (परिमंडळ-१) यांचेकडे योग्य त्या आदेशाकरीता अथवा अभिप्रायाकरीता सादर करावे. सदरबाबत अंदाजे १० दिवसांचा कालावधी देण्यात यावा.

वरिष्ठ निरीक्षक (अतिक्रमण निर्मुलन) ई विभाग यांनी सर्व अभिप्राय / आदेश प्राप्त झाल्यानंतर समितीच्या पुढच्या बैठकीचा दिनांक सात दिवस अगोदर सर्व सदस्यांना ई-मेल अथवा वैयक्तिक भ्रमणध्वनीवर कळवावे.

तदंनतर उपस्थित सर्व सदस्यांचे आभार व्यक्त करुन अध्यक्षांच्या परवानगीने सभा समाप्त झाल्याचे जाहीर केले.

सही
दि.१६.०८.२०१८
उपायुक्त (परि.-१)

**<u>सहाय्यक आयुक्त ए विभाग</u>**
**<u>सहाय्यक आयुक्त बी विभाग</u>**
**<u>सहाय्यक आयुक्त सी विभाग</u>**
**<u>सहाय्यक आयुक्त डी विभाग</u>**
**<u>सहाय्यक आयुक्त ई विभाग</u>**
**<u>अनुज्ञापन अधीक्षक</u>**
**<u>श्रीमती पतंगे, उप अनुज्ञापन अधीक्षक</u>**
**<u>वरिष्ठ निरीक्षक (अनुज्ञापन) ए / बी / सी / डी / ई विभाग</u>**
**<u>वरिष्ठ निरीक्षक (अतिक्रमण निर्मुलन) ए / बी / सी / डी / ई विभाग</u>**
**<u>सदस्य, नगर पथविक्रेता समिती परिमंडळ-१</u>**

श्रीमती.नयना कठपालीया,
NAGAR(एन.जी.ओ.अलाईन्स फॉर गव्हर्नन्स अॅन्ड रिन्युवल)
सेसिल कोर्ट, ३ रा मजला,
एम. कवी.भूषण मार्ग,
कुलाबा, मुंबई - ४०० ००१.
मो.९८२०२१६६२३

D: suhasini/2018/MOM 16.08.2018 Nagar pathvikreta samiti mom